# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत गौतम कंपाऊंड नवीवस्ती (२५ एम.एल.डी.), शांतीनगर (१५ एम.एल.डी.), पोगांव (२ एम.एल.डी.) नुरीनगर (२ एम.एल.डी.), व आझाद नगर (२ एम.एल.डी.) असे एकुण ५ क्लोरीनेशन प्लॅन्ट आहेत. सदर प्लॅन्टद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिके कडून घेण्यात येणाऱ्या पिण्याच्या पाण्याला क्लोरिन गॅसचा डोस देण्यात येतो. यापुर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तानसा मुख्य जलवाहिनी वरुन होणाऱ्या पाणी पुरवठ्या करीता योग्य प्रमाणात क्लोरिन गॅसची मात्रा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन देण्यांत येत होती. परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेची नविन जलवाहिनीवरुन पाणी वितरण व्यवस्था सुरु झाल्याने सदर पाण्यास क्लोरिनची मात्रा निरंक आहे. त्याकरीता वरील नमुद ठिकाणी होणाऱ्या पाणी पुरवठ्याकरीता क्लोरिनची मात्रा देणे आवश्यक व तातडीचे आहे. जेणे करुन होणाऱ्या पाणी पुरवठ्याद्वारे रोगराई पसरणे तसेच पावसाळ्याच्या दिवसांत पाण्यामुळे होणारे साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे व-हाळदेवी येथील ५ एम.एल.डी. जलशुध्दीकरण केंद्रातून दररोज भिवंडी शहरांतील काही भागांत पाणी पुरवठा करण्यांत येतो, जलशुध्दीकरण केंद्राची दैनंदिन देखभाल,निगा व दुरुस्ती तसेच जलशुध्दीकरणांत होणारी पंपींग, व-हाळा जी.एस.आर.पातळीची तपासणी करणे इत्यादी कामे करणे करीता कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

सदर क्लोरिनेशन प्लॅन्ट व जलशुद्धीकरण केंद्रामध्ये मनपाचे कर्मचारी कार्यरत होते. परंतू काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत सदर क्लोरिनेशन प्लॅन्ट व जलशुद्धीकरण केंद्रामध्ये मोटार चालू करणे, मोटार बंद करणे, क्लोरिन गॅस सिलेंडर लावून क्लोरिनेशनचा डोस देणे व दर तासाला ओटी टेस्ट करणे, इत्यादी कामे करण्यासाठी मनपाचे कर्मचारी उपलब्ध नाहीत. तरी क्लोरिन प्लॅन्ट चालविणे कामी अडथळे निर्माण होत आहेत. तसेच क्लोरिनेशन प्लॅन्टची माहिती असलेले कर्मचारी मनपा आस्थआपनाकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे क्लोरिन प्लॅन्ट व जलशुद्धीकरण केंद्र चालू ठेवून भिवंडी शहराला शुद्ध पाणी पुरवठा करणे जरुरीचे आहे. तरी सदर प्लॅन्टवर तीन शिफ्टमध्ये १) गौतम कंपाऊंड नविवस्ती - ६ कामगार, २) शांतीनगर - ६ कामगार, ३) पोगांव - ४ कामगार, ४) नुरीनगर - ४ कामगार ५) आझाद नगर - ४ कामगार व ६) वराळा जलशुद्धीकरण केंद्र - ६ कामगार असे एकुण ३० कामगार कर्मचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे.

तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या शेजारी असणाऱ्या महानगरपालिकांकडून माहिती घेतली असता सदर महानगरपालिकांच्या क्लोरिनेशन प्लॅन्ट तसेच जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती खाजगी ठेकेदारांमार्फत काम करण्यात येत आहे.

तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या शेजारी असणाऱ्या महानगरपालिकांकडून माहिती घेतली असता सदर महानगरपालिकांच्या क्लोरिनेशन प्लॅन्टची निगा, दुरुस्ती व वार्षिक देखभाल खाजगी ठेकेदारांमार्फत काम करण्यात येत आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिके अंतर्गत ठेकेदारांद्वारे करण्यांत येणाऱ्या कामावर कंत्राटी पद्धतीने काम करण्याऱ्या कामगारांना शासकिय नियमानुसार किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. सदर कामगारांना किमान वेतन लागू न केल्यास मुळ मालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करणेची तरतुद आहे. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात काम करणाऱ्यां कंत्राटी कामगारांना किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यांमध्ये वाढ झाल्यास कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्ता देय असणार आहे.

त्याकरीता मा. सहा. कामगार आयुक्त सो. भिवंडी यांचे कडुन कंत्राटी पद्धतीने / ठोक वेतनावर अर्धकुशल व अकुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणेबाबत प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे मुळ वेतन व विशेष भत्ता

मिळुन वेतन निश्चित करणे बाबत नविन दर प्राप्त करुन त्यास दि.१५/०२/२०२४ अन्वये मा. आयुक्त सो. यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता ₹१,२७,०१,४९१/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | **रु.१,२७,०१,४९१/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबत प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** 400 **दिनांक :** 05 /03 / २०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबत (बारा महिन्यांकरीता) ₹१,२७,०१,४९१/- मात्रच्या प्रस्तावास तसेच शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यांमध्ये वाढ झाल्यास कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्त्याची वाढ देय असणाऱ्या प्रशासकिय व आर्थिक ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझाद नगर क्लोरिनेशन प्लॅन्ट व वऱ्हाळा जलशुद्धीकरण केंद्राची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करीता मजुर सेवा पुरविणे बाबत (बारा महिन्यांकरीता) ₹१,२७,०१,४९१/- मात्रच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग**

**विषय:- भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणे कामाकरीता प्रशासकीय व आर्थीक मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रफळ २६.०४ चौ.कि.इतके असून सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ७,११,३२७ इतकी आहे. भिवंडी शहर वस्त्रोउद्योग धंद्याचे असून भिवंडी शहरांत उद्योगधंद्यासाठी शहरा लगत व इतर राज्यातून नागरीक ये जा करीत असतात व काही नागरीक वास्तव करून राहत असून शहराची तरंगती लोकसंख्या ३.५० लक्ष अशी एकुण १०.५० लक्ष इतकी लोकसंख्या आहे.

भिवंडी शहरात स्टेम प्राधिकरण यांचेकडून ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून ४२ द.ल.लि. तसेच मनपाचे वऱ्हाळा तलावमधून ५ द.ल.लि. असा एकुण १२० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे. लोकसंख्येच्या मानाने पाण्याची गरज १५० द.ल.लि प्रतिदिन इतकी पाण्याची आवश्यकता असून शहरामध्ये ३० द.ल.लि प्रतिदिन पाणी पुरवठयाची तुट असल्यामूळे शहरात पाणी टंचाई भासत आहे.

शहरामध्ये पाणी टंचाईग्रस्त भागात बोअरवेलव्दारे नागरीकांची पाण्याची गरज भागवीली जाते. प्रभाग समिती क्र.१ ते ५ दरम्यान १०३९ हातपंप, १०२४ सबमर्सिबल व जेट पंप ५२ असे एकुण २०९४ बोअरवेल आहेत. सदर बोअरवेल वारंवार किरकोळ दुरुस्तीमूळे नादुरुस्त होत असतात. तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात ३७५ चौ. मिटर जलवितरण व्यवस्था असून शहरातील जलवाहीनी गळती, घाण पाण्याची तक्रारी तसेच जलवाहीनी चेकअप व जलवाहीवर असलेले स्लुस व्हॉल्वचे गळती थांबविणेकरीता अशा दैनंदिन स्वरुपाच्या तक्रारीचे निवारण करून प्रभागातील नागरीकांना होणारा पाणी पुरवठा नियमित व पुरेशा प्रमाणात करणेत येतो. सन्मा.माजी नगरसेवक/नगरसेविका व पदाधिकारी, नागरीक यांचे दुरध्वनी, भ्रमणध्वनी व लेखी स्वरुपात दैनंदिन तक्रारी प्रभाग समिती क्र.१ ते ५ मध्ये प्राप्त होत असतात. बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्ती कामी येणाऱ्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्याचे दैनंदिन काम करावे लागते.

सद्या उन्हाळयाचे दिवस सुरु होत असून उन्हाळयात धरण पाणलोट क्षेत्रातील धरणातील पाण्याची पातळी कमी होत असते. स्टेम प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पाणी कपात केली जाते. त्यामूळे जलवाहीनीमधून कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा असतो. त्यामूळे पाणी टंचाईची परिस्थीती निर्माण होण्याचे दिवसांत नागरीकांना जलवितरण व्यवस्थेव्दारे तसेच बोअरवेल, हातपंप,सबमर्सिबल,जेटपंपाव्दारे नियमिती व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होण्यासाठी बोअरवेल व पाईप लाईन निगा व दुरुस्तीचे कामासाठी मजूर सेवा पुरविणेकामी मंजूरी मिळणे आवश्यक आहे.

त्याकरीता मा.सहा.कामगार आयुक्त सो. भिवंडी यांचेकडुन कंत्राटी पध्दतीने /ठोक वेतनावर अर्धकुशल व अकुशल कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणेबाबत प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे मुळ वेतन व विशेष भत्ता मिळुन वेतन निश्चित करणेबाबत नविन दर प्राप्त करून त्यास दि.१५/०२/२०२४ अन्वये मा.आयुक्त सो. यांची मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता **रु.२,३६,१४,१५७/-** मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्र निहाय बोअरवेल निगा दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेकरीता प्रत्येकी ४ अकुशल कामगार व १ अर्धकुशल तसेच पाईप लाईन निगा दुरुस्ती करीता मजूर सेवा पुरविणेकामी प्रत्येकी ५ अकुशल कामगार व १ अर्धकुशल असे एकुण ५५ कामगार लागणार आहेत. किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत सदर कामी रुपये **२,३६,१४,१५७/-** मात्र खर्च अपेक्षित आहे, प्रस्तावास मा.आयुक्त सो. यांनी दि.०१/०३/२०२४ रोजी प्रशासकीय व आर्थीक मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणे सन २०२४-२०२५.** | **२,३६,१४,१५७/-** |

सद्या कालावधीत मा.महासभा व मा.स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र.एम. सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या आर्थीक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्र निहाय बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणे बाबतच्या कामाकरीता प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** ३९८ **दि.** ६ **/ ०३/२०२४**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत (सन २०२४-२५) **रु.२,३६,१४,१५७/-** मात्रच्या प्रस्तावास तसेच शासन निर्णयानुसार मुळ वेतन व विशेष भत्त्यामध्ये वाढ झाल्यास कंत्राटी कामगारांना मुळ वेतन व विशेष भत्त्याची वाढ देय असणाऱ्या प्रशासकीय व आर्थीक ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम.सी.ओ-२०२०/ प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०१५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्र निहाय बोअरवेल व पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणे बाबत **रु.२,३६,१४,१५७/-** मात्रच्या प्रस्तावास मान्यता देऊन प्रशासकीय व आर्थीक मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
O/C **भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

**विषय :- प्रभाग क्र. १७ मधील पद्मानगर परिसरात विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज तयार करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या **प्रभाग क्र. १७ मधील पद्मानगर परिसरात विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज तयार करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६९,९९,९०८/-) या कामाची बी-१ प्रकारची फेर ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. १६७/२०२३-२४ (ऑनलाईन टेंडर क्र. १००९४३३) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन सदर कामासाठी ई-निविदा मागविणेत आहे. सदर कामासाठी एकुण पात्र ०१ निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५१% दराने कमी असुन त्यानुसार कामाची रक्कम रु. ६९,९६,३३८/- (**GST** सह) येत आहे.

**मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांची प्राकलन दरापेक्षा ०.०५१% कमी दराची निविदा रक्कम **रु. ६९,९६,३३८/-** (अक्षरी रु. एकोणसत्तर लाख शहान्नव हजार तिनशे अडोतीस रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक ०५/०३/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रं. : ३९८ दिनांक :- ११/३/२०२४

**प्रभाग क्र. १७ मधील पद्मानगर परिसरात विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज तयार करणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.०५१% कमी दराची म्हणजेच रक्कम रु. ६९,९६,३३८/- (अक्षरी रु. एकोणसत्तर लाख शहान्नव हजार तिनशे अडोतीस रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकरी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, **प्रभाग क्र. १७ मधील पद्मानगर परिसरात विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज तयार करणे.** याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. बुबेरे अँड असोसिएट्स, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :- प्रभाग समिती क्र ०५ च्या कार्यक्षेत्रातील पावसाळया नंतर मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने दुरुस्ती (पॅचवर्क पध्दतीने)करणे.**

**प्रभाग समिती क्र ०५ च्या कार्यक्षेत्रातील पावसाळया नंतर मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने दुरुस्ती (पॅचवर्क पध्दतीने)करणे**.कामी रक्कम रु. **४९,९७,९३२/-** मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रशासकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. ३०६

दिनांक :- ०६/०३/२०२४

**प्रभाग समिती क्र ०५ च्या कार्यक्षेत्रातील पावसाळया नंतर मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्तीकरणे**..कामी रक्कम रु. **४९,९७,९३२/-**. मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त, **प्रभाग समिती क्र ०५ च्या कार्यक्षेत्रातील पावसाळया नंतर मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने दुरुस्ती (पॅचवर्क पध्दतीने) करणे**.कामी रक्कम रु. **४९,९७,९३२/-** - मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय ठरावाची मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका